


# ३९ वा
# वार्षिक अहवाल
# २०२१-२२

## वात्सल्य ट्रस्ट, मुंबई

नोंदणी क्र. मुंबई E.९१८० / ०८-०२-८३

वात्सल्य

Est. - Feb 1983

## Names of Trustees

1. Dr. Ainapure Vilas, President
2. Shri. Joshi Shrikant, Secretary
3. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer
   Till 05.02.2022
4. Smt. Barve Usha
5. Shri. Desai Shrikrishna
6. Adv. Gaonkar Prasad
7. Shri. Kadhe Janardan
8. Dr. Pandit Uday
   From 15.05.2021
9. Dr. S. Raman Srinivasa
10. Shri. Saraf Nagnath
11. Shri. Vaidya Ramchandra

## विश्वस्तांची नावे

डॉ. ऐनापुरे विलास, अध्यक्ष
श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह
श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा
दि. ०५.०२.२०२२ पर्यन्त
श्रीमती बर्वे उषा
श्री. देसाई श्रीकृष्ण
ॲड. गांवकर प्रसाद
श्री. कढे जनार्दन
डॉ. पंडित उदय
दि. १५.०५.२०२१ पासून
डॉ. एस. रामन श्रीनिवासा
श्री. सराफ नागनाथ
श्री. वैद्य रामचंद्र

## Names of Managing Committee Members

1. Smt. Gadre Anjali, Chairperson
2. Shri. Joshi Shrikant, Secretary
3. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer
   Till 05.02.2022
4. Shri. Abhyankar Dilip, Member
5. Smt. Dhakras Sandhya, Member
6. Smt. Joshi Shobha, Member
7. Shri. Kulkarni Girish
   From 03-07-2021
8. Shri. Pandit Uday, Member
   Till 14.05.2021
9. Shri. Sathe Vidyadhar, Member
10. Shri. Vaidya Vishwas, Member

## कार्यकारिणी सदस्यांची नावे

श्रीमती गद्रे अंजली, कार्याध्यक्षा
श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह
श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा
दि. ०५.०२.२०२२ पर्यन्त
श्री. अभ्यंकर दिलीप, सदस्य
श्रीमती धाक्रस संध्या, सदस्य
श्रीमती जोशी शोभा, सदस्य
श्री. कुलकर्णी गिरीश, सदस्य
दि. ०३.०७.२०२१ पासून
श्री. पंडीत उदय , सदस्य
दि. १४ .०५.२०२१ पर्यन्त
श्री. साठे विद्याधर, सदस्य
श्री. वैद्य विश्वास, सदस्य

## AUDITORS

**M/s. CVK & Associates (Chartered Accountant)**

Ground Floor, Samarth Apartments, D.S. Babrekar Marg,
Gokhale Road North, Dadar (West), Mumbai 400 028.

# दृष्टीक्षेपात वात्सल्य
# VATSALYA AT A GLANCE

संस्थेचे नाव : **वात्सल्य ट्रस्ट, मुंबई**

Name of Institution : **VATSALYA TRUST, MUMBAI**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा नोंदणीक्रमांक

Registration No. under Maharashtra Public Trust Act

**E. 9180 / BOM 8.2.83**

आयकर खात्याच्या कलम १२ (अ) खाली नोंदणीक्रमांक

Registration No. under Section 12 (A) of income Tax Act

**URN - AAATV0345HE20217** Valid till 31.03.2026

आयकर खात्याच्या कलम ८० (जी) खाली नोंदणीक्रमांक

Registration No. under Section 80 (G) of income Tax Act

**URN - AAATV0345HF20215** Valid till 31.03.2026

विदेशातून देणग्या घेण्याबाबत केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाकडून मिळालेल्या प्रमाणपत्राचा नोंदणी क्र.

Registration under Foreign Exchange Regulation Act, 1976

**FCRA No. : 083780862**

PAN NO.

**AAATV0345H**

---

## Addresses, Telephone Nos. and Email ids of our Projects

### KANJURMARG

Near Kanjurmarg Police Station, Kanjurmarg (East), Mumbai 400 042.
Tel.: 2578 4810/8422883150/8422883149 | Email id : admin@vatsalyatrustmumbai.org

### SANPADA

Plot No. 11, Sector No.2, Near Oriental College, Sanpada, Navi Mumbai 400 705.
Tel.: 2775 7390 / 2775 3689 / 8422883148/ 8422883141/ 8591046910 (WhatsApp)
Email: sanpada@vatsalyatrustmumbai.org

### ALIBAG

**Orphanage :** House No. 1510-B-2, Behind Mayur Bakery, Alibag, Dist. Raigad 402 201.
Tel.: 02141- 220216 Email: alibag@vatsalyatrustmumbai.org

**RC and Computer Centre :** Sai Somnath Bungalow, Near Hotel Spice land, Burumkhan, Varsoli,Tal. Alibag, Dist. Raigad

### BADLAPUR

Mauje Bhoj, Survey No.12/1, 12/2, 13/1, Badlapur, Dist. Thane

### KURLA

Bhagini Mandal – Brahmanwadi, Moreshwar Patankar Marg, Kurla (W), Mumbai 400 070.

# Names of Banks and Account Nos. for ONLINE DONATION

**Beneficiary Name : VATSALYA TRUST MUMBAI**

1. **STATE BANK OF INDIA – Kanjur Marg (Only for Indian Donation)**
   Branch Code – 06249
   IFSC Code – SBIN0006249
   Current Account No. – 35562836398
2. **STATE BANK OF INDIA – New Delhi (Only for Foreign Donations)**
   Branch Code – 00691
   IFSC Code – SBIN0000691
   Swift Code – SBININBB 104
   Account No. – 40137265409
3. **INDIAN OVERSEAS BANK – Sanpada Project**
   **(Only for Indian Donation)**
   IFSC Code – IOBA0001502
   Savings Account No. – 150201000001551
4. **BANK OF MAHARASHTRA – Alibag Project**
   **(Only for Indian Donation)**
   IFSC Code – MAHB0000229
   Savings Account No. – 20109646941

Our foreign donors may kindly note the Foreign Account Number of the Trust is as per the FCRAAct.

## VATSALYA TRUST, MUMBAI

## नम्र विनंती

या अहवालाद्वारे आपणा सर्व देणगीदार / हितचिंतक यांस कळकळीची विनंती आहे की आपण आपली देणगी शक्यतो धनादेशाद्वारे अथवा ONLINE सेवेद्वारे द्यावी. तसेच देणगीदारांनी देणगी देताना आपला इमेल आय. डी.आणि मोबाईल क्रमांक प्रत्यक्ष किंवा संस्थेच्या इमेलवर जरूर कळवावा. त्यामुळे संस्थेचा वार्षिक अहवाल इमेलद्वारे पाठवणे आम्हाला सोपे जाईल. संस्थेचा इमेल आय. डी. **admin@vatsalyatrustmumbai.org** तसेच संस्थेची स्वतंत्र वेबसाईटदेखील आहे **vatsalyatrustmumbai.org**

'वात्सल्य' च्या नावाचे ओळखपत्र व पावतीपुस्तक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे देणगीची रक्कम किंवा कोणत्याही प्रकारची देणगी देऊ नयेत. संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे ओळखपत्र व पावतीपुस्तक दिलेलेच असते. कृपया देणगी देताना या सर्व बाबींची खातरजमा करून घ्यावी.

देणगीचा धनादेश 'वात्सल्य ट्रस्ट, मुंबई' / 'Vatsalya Trust, Mumbai' या नावाने काढावा.

ऑन लाईन पेमेंट साठी Website Payment Gateway (SBI Collect) चा वापर करावा.

Master, VISA, RuPay, Credit / Debit Cards / Scan Pay अशा विविध कार्डचा वापर करूनही आपण देणग्या देऊ शकता.

# दृष्टिक्षेपात वात्सल्य ट्रस्ट मुंबई

| केंद्रे | कांजुरमार्ग | सानपाडा | अलिबाग | कुर्ला |
|---|---|---|---|---|
| अर्भकालयात वास्तव्यास असलेली मुलांची संख्या | २६ | - | ५ | - |
| दत्तक गेलेली मुलांची संख्या | २२ | - | ७ | - |
| पुनर्वसन केंद्र | ३५० हून अधिक लाभार्थी २८२ दिव्यांगांना पुनर्वसन साहित्य दिले. | | | |
| रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण केंद्र | ६५ | ४० | १३४ मुली इतर जिल्ह्यातील लाभार्थी | |
| संगणक प्रशिक्षण केंद्र | सर्व जिल्ह्यांमधून एकूण ७४९ लाभार्थी | | | |
| ड्राईव्ह विथ प्राईड | १०० | - | - | - |
| बालिकाश्रम | ६३ | - | - | - |
| वृद्धाश्रम | ५ | - | - | - |
| *ई - विद्या केंद्र* | यादीप्रमाणे | - | - | - |

## PAP Centers

| Sr. No. | District | Name of Organisations |
|---|---|---|
| 1 | Mumbai-Kanjurmarg | Vatsalya Trust Mumbai |
| 2 | Sanpada | Vatsalya Trust Sanpada Seva Prakalp |
| 3 | Latur | Janakalyan Niwas Vidyalaya |
| 4 | Rajapur | Amal Vidyavardhini Skill Development |
| 5 | Dapoli | Lokmanya Public Charitable Trust |
| 6 | Walvanda | Jawhar |

## DRIVE WITH PRIDE CENTERS

| Sr.No. | District | Name of Organization |
|---|---|---|
| 1 | Palghar-Jawhar | Shabari Seva Samiti |
| 2 | Nandurbar | Shabari Seva Samiti, Taloda |
| 3 | Palghar-Talasari | Sneha Samaj Utthan Sanstha |
| 4 | Palghar-Mokhad | Parivartan Mahila Sanstha |
| 5 | Beed | Shramik Manch Gramin Vikas Kendra |
| 6 | Karad | Annapurna Sanstha, Karad |
| 7 | Islampur | Prerna Rural Development Foundation |
| 8 | Solapur | Sarathi Youth Foundation |
| 9 | Latur | Sevalay (JCB Training) |

## E-Vidya Centres

| Sr.No. | District | Name of Organization |
|---|---|---|
| 1 | Kanjurmarg | Vatsalya Trust Mumbai |
| 2 | Sanpada | Vatsalya Trust Seva Prakalp |
| 3 | Kurla | Vatsalya Trust Mumbai |
| 4 | Alibag | Vatsalya Trust Mumbai |
| 5 | Rajapur-Kondye | Amal Vidyavardhini Skill Development Center,Kondye. |
| 6 | Pali | Ballal vinayak madhyamik prashala pali |
| 7 | bhayandar | keshavsrushti krushi tantra vidyalay |
| 8 | Ulhasnagar | Global Rights Foundation |
| 9 | Ratnagiri | N.P.Abhayankar observation of Ratnagiri and Dr.N.D. Panwalkar Balgruh |
| 10 | Rahata, Dist-Ahmednagar | Shri Naresh Raut Foundation |
| 11 | Latur-Harangul(BK) | Jankalyan Niwas Vidyalaya |
| 12 | Dapoli-Ratnagiri | Lokmanya Public Charitable Trust, Chikhalgaon |
| 13 | Pandharpur-Kauthali | Rajnandini Madhyamik Vidyaly |
| 14 | Latur -Hasegaon | Aamhi sevek sanstha |
| 15 | Ratnagiri-Devrukh | Matumandir Devarukh Sanchalit Gokul mulinche Balgruh |
| 16 | Ratnagiri-Hatkhamba | Maher Mulinche Balgruh |
| 17 | Ratnagiri- Oni | Vatsalya Mandir Balgruh |
| 18 | Ratnagiri-Lanja | Tendulkar Mahila Ashram Balgruh |
| 19 | Ratnagiri-Kudvali | Sandipani Balgruh |
| 20 | Aurangabad | Savitribai Mahila Sanstha and Skilling Centre |
| 21 | Aurangabad chouka | Savitribai Mahila Sanstha and Skilling Centre |
| 22 | Bhandup | Durva Purva Foundation, Mumbai |
| 23 | Anjurle | M.K. High School Anjarle |
| 24 | Boriwali | BIMA NAGAR EDUCATION SOCIETY |
| 25 | Rajapur | Rajapur Vidyalay |
| 26 | Latur | Janaadhar |
| 27 | Sangali | Institute of Rural Credit and Entrepreneurship Development, Sangli |
| 28 | Doda Marg Goa | Navnirman Sanstha |
| 29 | Fonda Goa | Keshav Sevak Sadhana |
| 30 | Becholine Goa | Keshav Sevak Sadhana |
| 31 | Rajapur-Mithgavan | Anjeneshwar Gramstha |
| 32 | Andheri | Shri Rajasthani Seva Sangh |
| 33 | Pandharpur - Hole | Matoshri Rukmini Gangaram Holkar Vidyalaya Hole |
| 34 | Gujarat-Badoda | E Plus Foundation |

# दि. १ एप्रिल २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ चा वार्षिक अहवाल सादर करत आहोत.

'वात्सल्य' चे सर्व कार्यकर्ते, देणगीदार व हितचिंतक यांचे मन:पूर्वक आभार !!

## विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळ

अहवाल सालात दि. १५.०४.२०२१ रोजीपासून डॉ. उदय पंडीत यांची विश्वस्तपदी नेमणूक झाली. पूर्वी ते कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते.

संस्थेच्या संस्थापिका व अहवालसालात कार्यरत कोषाध्यक्षा कै. श्रीमती संजीवनीताई रायकर यांचे दि. ०५.०२.२०२२ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

## संस्थेचे लेखापरिक्षक

२०२१ - २२ या आर्थिक वर्षात संस्थेच्या लेखापरिक्षणाचे काम दादर येथील M/s.CVK & Associates या आस्थापनेकडे दिले आहे.

## ISO प्रमाणपत्र

TUV Austria यांचे ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र संस्थेच्या कांजुरमार्ग व सानपाडा येथील पुनर्वसन केंद्र व रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र, संगणक प्रशिक्षण केंद्र तसेच कांजुरमार्ग येथील अर्भकालय आणि दत्तक विधान केंद्र, 'ड्राइव विथ प्राइड' आणि सानपाडा येथील बालिकाश्रम, वृद्धाश्रम या उपक्रमांना प्राप्त झाले. अहवालसालात दि. २३.११.२०२१ रोजी श्री. विद्याधर अपशंकर यांनी संस्थेच्या प्रकल्पांना भेट देऊन लेखापरिक्षण केले.

वार्षिक तपासणी

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, चेंबूर येथील संरक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेला भेट देऊन संस्थेचे दस्तऐवज तपासून त्यावे मोलाच्या सूचना दिल्या आहेत. वात्सल्य ट्रस्टमधील मुलांसाठी बनवले जाणारे जेवण व संस्थेतील स्वच्छता याची सर्व अधिका-यांनी कौतुक केले आहे.

अहवाल सालात खालील अधिका-यांनी संस्थेला भेट देऊन तपासणी केली.

३१.१२.२०२१ : श्री. नागरगोजे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, चेंबूर

०८.०२.२०२२ : श्री. जाधव व सहकारी, बाल विकास अधिकारी, मानखुर्द

२८.०२.२०२२ : श्रीमती स्नेहा जोशी आणि श्रीमती प्रीती बुवा, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, चेंबूर

महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या उत्तम सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने मी आभार मानतो.

वार्षिक मेळावा

दि. २६ मार्च २०२२ रोजी दादरच्या बी. एन. वैद्य सभागृहामध्ये वात्सल्य ट्रस्टचा वार्षिक मेळावा साजरा झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सौ. चिन्मयी सुमीत व प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेता श्री. अभिजित केळकर उपस्थित होते. मान्यवर पाहुणे व संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास ऐनापुरे, कार्यवाह श्री. श्रीकांत जोशी व विश्वस्त श्री. नागनाथ सराफ यांनी दीपप्रज्वलन केले.

संस्थेतील मुलांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मृणालिनी

कुलकर्णी व सौ. नीता भागवत यांनी केले.

मुलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमांत मुलांसोबत कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सौ. चिन्मयी सुमीत यांनीही मनमुराद आनंद घेतला. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांनी उपस्थितांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेत ज्या कर्मचा-यांना २५ वर्षे पूर्ण झालीत त्यांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच मागील वर्षभरात ज्यांनी उत्तम काम केले अशा कर्मचा-यांचाही सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या नियमित देणगीदार श्रीमती वर्षा भगत यांनी आपल्या सहका-यांसोबत 'करॉके' गायनाचा बहारदार कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## प्रशासन

'वात्सल्य ट्रस्ट' चे ११ विश्वस्त आहेत. त्यापैकी ३ कायमस्वरूपी व ८ बदलत्या स्वरुपात आहेत. बदलत्या स्वरूपातील विश्वस्तांची मुदत ६ वर्ष आहे. मात्र दर ३ वर्षांनी ४ विश्वस्त ज्यांचा ६ वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे ते निवृत्त होतात. विश्वस्तांची बैठक दर ३ महिन्यांनी तर कार्यकारिणी मंडळाची बैठक दर महिन्याला घेतली जाते. त्याखेरीज विश्वस्त वेळोवेळी सभा घेवून महत्वाच्या विषयांवर चर्चा करतात व निर्णय घेतात. विश्वस्तांच्या बैठकीत महत्वाच्या गोष्टींचं निवेदन केलं जातं व आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सभेच्या इतिवृत्तांची नोंद ठेवली जाते. संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार संस्थेच्या कामाची दिशा संस्थेच्या विश्वस्तांकडून ठरवली जाते. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचं आयोजन करतात व त्यावर देखरेख करतात.

'वात्सल्य' चे विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य कुठल्याही प्रकारचे मानधन घेत नाहीत. आजपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचा अथवा सदस्याचा परदेश दौ-याचा खर्च संस्थेने केलेला नाही.

### आस्थापनावरील खर्च

| कर्मचारी | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| दरमहा रु. १०,०००/- पर्यंत | ९० | १० | १०० |
| दरमहा रु. १०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत | ६५ | ६ | ७१ |
| दरमहा रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत | १० | ३ | १३ |
| दरमहा रु. ३०,००१/- पेक्षा जास्त | १ | - | १ |
| एकूण | १६६ | १९ | १८५ |

# कांजूरमार्ग

## अर्भकालय व दत्तक विधान

'वात्सल्य ट्रस्ट' मध्ये २०२१- २०२२ या वर्षात कांजूर येथील अर्भकालयात २६ मुलं दाखल झाली टर अलिबाग येथील अर्भकालयात ५ मुलं दाखल झाली. अहवालसालात संस्थेने कांजूर येथून २२ मुलांना तर अलिबाग येथून ७ मुलांना दत्तक प्रक्रियेच्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून नवीन कुटुंबं मिळवून दिली आहेत. यापैकी २ मुलांचे परदेशी कुटुंबात पुनर्वसन करून दिले आहे.

संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून गेल्या ३७ वर्षात दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत कांजूर येथून एकूण १२३२ मुलांना संस्थेने दत्तक पालक मिळवून दिले आहेत. तसेच अलिबाग येथून एकूण ९३ मुलांना दत्तक देण्यात आले. वरील प्रमाणे संस्थेने एकूण १३२५ मुलांना दत्तक दिले आहे. सर्व दत्तक मुलांची प्रगती समाधानकारक आहे हे सांगायला मला विशेष अभिमान वाटतो.

संस्थेत कांजूर येथे सध्या २२ अर्भके आणि २ विशेष मुले अशी एकूण २४ मुले वास्तव्यास आहेत. त्याखेरीज ७ मुले इतर संस्थांमध्ये शिक्षण व विशेष देखभालीसाठी दाखल करण्यात आली आहेत.

वात्सल्यमध्ये अगदी एक दिवसापासुनची तान्ही बाळे दाखल केली जातात. वात्सल्यमधील सेवाभावाने काम करणाऱ्या सेविका, परिचारिका आणि पर्यवेक्षिका अथक प्रयत्नाने ह्या मुलांचे पालनपोषण करतात. सेविका आईच्या मायेने त्यांचे संगोपन करतात. कर्मचाऱ्यांच्या ह्या मानवतापूर्ण कार्याचा 'वात्सल्य' ऋणी आहे.



Image 1 – अर्भकालय कांजुरमार्ग

## पुनर्वसन केंद्र

पूर्ण वर्षभर कोविड – १९ च्या महामारीने निर्माण झालेल्या आव्हानांना सामोरे जात पुनर्वसन केंद्रातील व्यावसायिक कर्मचाऱ्यानी सेवाभावी वृत्तीने अथक परिश्रम करून पुनर्वसन केंद्राचे काम चालू ठेवले व वाढविले आणि लातूर, रत्नागिरी इत्यादि ठिकाणी तसेच रायगड जिल्ह्यात विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या साठी थेरपी व उपचार तसेच पुनर्वसन साहित्याचे वाटप करण्यात आले.

पुनर्वसन केंद्रात विशेष गरज असेलेल्या मुलांना, ज्यांच्या नियमित वाढीत कमतरता दिसून येते अशांना आणि त्यांच्या पालकाना केंद्रातील पुनर्वसन व्यावसायिकांकडून मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येते. वात्सल्यच्या पुनर्वसन केंद्रात विशेष शिक्षण, ओक्यूपेशन थेरपी, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, समुपदेशन, सामूहिक थेरपी आणि व्यवसाय मार्गदर्शन दिले जाते.

सध्या वात्सल्यच्या कांजूर, अलिबाग, सानपाडा येथील केंद्रांमध्ये सेरेब्रल पालसी, ओटीझम, गतीमंदता, ADHD, एंजेल मॅन सिनड्रॉम, डाऊनस् सिनड्रॉम, मतीमंदता, हेमीप्लेगिया, ग्लोबल डेव्हेलपमेंटल डीले अशा समस्यांचा सामना करणाऱ्या सुमारे २०० मुलांना उपचार व मार्गदर्शन देण्यात येते.

पुनर्वसन केंद्राच्या कामामध्ये मुख्यत: तीन विभागांचा समावेश होतो.

१. **आकार –** ह्या केंद्रात फिजिओ थेरपी, स्पीच आणि ऑक्यूपेशनल थेरपी यांसारख्या उपचार पद्धतींचा वापर केला जातो. यामुळे मुलांच्या मानसिक दुर्बलता, भाषा आणि उच्चार यांसारख्या समस्यांवर इलाज होऊ शकतो.

२. **ख़ुशी -** बालक आणि पालक मार्गदर्शन केंद्र – हे केंद्र मुलांच्या वागणूक, भावनात्मक, शैक्षणिक अशा विविध समस्या यांवर उपचार करतं. यासाठी केंद्र मानसोपचार, कौटुंबिक उपचार, मुलांवर उपचार, पालकांचा कौशल्य विकास आणि शिक्षकांची संवेदनशीलता आदी कार्यक्षम करतं.

३. **दिशा –** यामध्ये पुनर्वसनासाठी लागणारी साहित्य आणि मदत विशेष गरजा असणा-या मुलांना व इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातून वात्सल्यतर्फे पुरवली जातात. यावर्षी २५० हून अधिक मुलांना पुनर्वसन साहित्य व साधनांचे (उदा. श्रवणयंत्रे, ऑर्थोसिस इ.) वाटप करण्यात आले. विविध स्वयंसेवी संस्था, पुनर्वसन व्यावसायिक यांच्या माध्यमातून विविध ठिकाणच्या जास्तीत जास्त गरजू मुलांना लाभ देण्याचा प्रयत्न केला जातो.

४. **व्यवसाय आणि पूर्व व्यवसाय मार्गदर्शन -** विशेष गरजा असणा-या मुलांना व्यवसाय मार्गदर्शना द्वारे उत्पन्नाचे साधन निर्माण करून स्वत:च्या पायावर उभे राहण्यास दिशा दाखविण्याचे प्रयत्न करण्यात येतात. २१.१०.२०२१ ला कुर्ला येथील केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

विशेष गरजा असणा-या मुलांच्या विकासासाठी असलेले सर्व कार्यक्रम पुनर्वसन केंद्रामार्फत समग्र दृष्टीकोनातून राबवले जातात.

कांजूर येथील पुनर्वसन केंद्रात आजपर्यंत २५०० हून अधिक मुलांवर उपचार करण्यात आले. सध्या दर आठवड्याला सुमारे १२५ मुलांवर येथे उपचार करण्यात येतात.

वात्सल्य कांजूर येथे ११.१२.२०२१ रोजी 'विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिवस' साजरा करण्यात आला. 'विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तींच्या समस्या, आव्हाने, आणि त्यावर मात करण्यास लागणारे सहाय्य तसेच त्यांचे मूलभूत अधिकार यांचा प्रचार व प्रसार ह्या दिवसाच्या निमित्ताने केला गेला. विशेष गरजा असणा-या मुलांचा व त्यांच्या पालकांचा दुर्दम्य आशावाद, चिकाटी व जिद्द सर्वांना प्रेरणादायी आहेत. NSDL ई गवर्नन्स इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेड (प्रोटिन ई गवर्नन्स टेकनोलोजीज् लिमिटेड) चे उपाध्यक्ष श्री. अजय मूंजे व त्यांचे सहकारी यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून मुलांचे आणि पालकांचे कौतुक केले. एकूण ६५ मुलांनी आणि पालकांनी कार्यक्रमात भाग घेतला. मुलांनी नृत्य व फॅन्सिड्रेस स्पर्धेत भाग घेतला. विशेष मुलांनाही योग्य वाढीसाठी संधि मिळण्याची गरज असल्याचेच ह्या कार्यक्रमाने दाखवून दिले.

ओरथोसिस शिबिर : ह्यावर्षी महाराष्ट्रात एकूण १० शिबिरे घेण्यात आली. संवेदना, लातूर, AWMH, आविष्कार स्पेशल स्कूल, रत्नागिरी ह्यासारख्या संस्थांबरोबर सहकाराने जास्तीत जास्त लाभार्थीपर्यन्त पोहोचण्याचा प्रयत्न

करण्यात आला. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना वात्सल्य आणि प्रायोजक यांच्या सहाय्याने करण्यात आलेल्या सदर शिबिरांचा खूपच फायदा झाला व ओरथोसिस आणि श्रवणयंत्रांचे मुलांना मोफत वाटप करण्यात आले.

(१) अलिबाग दि . ०३.०६.२०२१ – ओरथोसिसचे ६ मुलांना आणि श्रवणयंत्रांचे १० मुलांना मोफत वाटप करण्यात आले.

(२) सानपाडा दि. ०५.१०.२०२१ आणि २१.११.२०२१ - विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी वात्सल्यच्या सानपाडा शाखेत आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात २६ मुलांना ओरथोसिसचे आणि ९ मुलांना श्रवणयंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले. पुनर्वसन केंद्राचे सर्व कर्मचारी, सानपडा येथील कर्मचारी आणि ऑरथोसिस तज्ञ श्री. .. .. .. राजे आणि त्यांचे सहकारी तसेच ऑडिओलॉजिस्ट श्रीमती मोहिनी यासर्वांच्या प्रयत्नाने सदरचे शिबिर यशस्वी झाले.

(३) रोहा १९.१०.२०२१ – दिशा शिबिर- विशेष गरज असणाऱ्या मुलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ह्या शिबिराचा लाभ २५ मुलांनी घेतला. ओटीस्ट डॉ. अंकित, डॉ. नवाज, स्पीच थेरेपिस्ट डॉ. ऋषिकेश, मानसोपचार तज्ञ आदिती, ऑरथोसिस तज्ञ श्री. .. .. .. राजे, बालरोग तज्ञ डॉ. अंकिता आणि त्यांचे सहकारी यांनी सदरचे शिबिर यशस्वी केले. कायनेस्थॉटेपिंग ( स्नायूचा कडकपणा कमी करण्यासाठी), ऑरथोसिस (स्प्लिन्ट ), श्रवणयंत्रांचे वाटप आणि समुपदेशन केले.

(४) दिशा पाठपुरावा शिबिरे २४.१२.२०२१ रोजी रोहा येथे आणि २५.१२.२०२१ रोजी अलिबाग येथे घेण्यात आली त्यात ३० मुले आणि त्यांच्या पालकांनी सहभाग घेतला. ह्या शिबिरात डॉ. सलमा, डॉ. सारा, सिस्टर श्रीमती महाडीक आणि श्रीमती सानप, फार्मसिस्ट श्री. प्रथमेश यांनीही योगदान दिले. सदर शिबिरात ६ ऑरथोसिस, १० श्रवणयंत्रांचे यांचे वाटप करण्यात आले.

(५) कांजूर – २५.०२.२०२२ – या शिबिरात तज्ञांकडून ७४ विशेष गरज असणाऱ्या मुलांसाठी दृष्टिदोष, दंतचिकित्सा व आहार विषयक सल्ला देण्यात आला.

(६) अलिबाग – २७.०२.२०२२ – सदर शिबिरात ८ ऑरथोसिस, १२ श्रवणयंत्रांचे यांचे वाटप करण्यात आले.

(७) कांजूर – २२.०३.२०२२ – सदर शिबिरात १९ ऑरथोसिस, १३ श्रवणयंत्रांचे यांचे वाटप करण्यात आले.

(८) लातूर – २५.०३.२०२२ - सदर शिबिरात ३६ ऑरथोसिस, ६ श्रवणयंत्रांचे यांचे वाटप करण्यात आले.

(९) रत्नागिरी – २८.०३.२०२२ - सदर शिबिरात २४ ऑरथोसिस, ०२ श्रवणयंत्रांचे यांचे वाटप करण्यात आले.

वर्षभरातील एकूण १० शिबिरांच्या माध्यमातून ३५० हून अधिक विशेष गरज असलेल्या मुलांपर्यन्त पोहोचून त्यातील २८२ मुलांना वरील प्रमाणे सहाय्य करण्यात आले.

NSDL ई गवर्नन्स इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेड (प्रोटिन ई गवर्नन्स टेकनोलोजीज् लिमिटेड) यांनी केलेल्या मौल्यवान सहाय्याबद्दल वात्सल्य त्यांचे आभारी आहे.

Image 2 – पुनर्वसन केंद्र





## रुग्णसहाय्यक अभ्यासक्रम

कुटुंबातील कठीण आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागलेल्या किंवा १०वी / १२ वि पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींसाठी २००६ पासून वात्सल्य ट्रस्ट ने हा रुग्णसहाय्यक शिक्षणक्रम (YCMOU मान्यताप्राप्त) हा कोर्स सुरु केला. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना 'PAP ' या कोर्सच्या माध्यमातून स्वावलंबनाची नवी दिशा दाखवली. रुग्णसहाय्यक प्रशिक्षणास 'यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची' मान्यता मिळालेली आहे.

आतापर्यन्त ७५० मुलींनी हे प्रशिक्षण पूर्ण करून आज चांगल्या हॉस्पिटल मध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. रुग्णसहाय्क या एक वर्षाच्या शिक्षणक्रमाचा लाभ २०२१-२२ या वर्षात ६५ मुलींनी घेतला .

सुरुवातीच्या चार महिन्यांमधे. डॉ. ज्योति जाधव, डॉ. अलका बेडीकर, श्रीमती चव्हाण, श्रीमती रेणुका साळगांवकर आणि श्रीमती क्षमा पेंडसे या तज्ज्ञ डॉक्टर्स व नर्सेस यांच्या सखोल मार्गदर्शनानुसार अभ्यासक्रम सविस्तररूपात पूर्ण करण्यात आला.

नोव्हेंबर मध्ये विद्यार्थिनींनी हिरांमोंगी हॉस्पिटल (मुलुंड ) व अश्विनी हॉस्पिटल ( घाटकोपर ) येथे आपल्या कार्यक्रमाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. वरील हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांचे मी आभार मानतो.

अभ्यासाला पूरक उपक्रम मुलींच्या कलागुणांना संधी देतात, याच विचारातून या वर्षी जागतिक महिला दिन ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिन PAP च्या विद्यार्थिनी व आपल्या 'वात्सल्य ' मधील सर्व महिला कर्मचारी वर्ग यांनी



दिमाखदार रीतीने संयुक्तपणे साजरा केला . या विशेष दिनी भांडुप पोलीस स्टेशन च्या ACP मा. सुरेखा कपिल व ' इंडियन एज्युकेशन सोसायटी ' सर्व शाखांच्या सल्लागार अधिकारी मा. सौ. अभिलाषा चिटणीस प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या . आपल्या सहजसुंदर मार्गर्शनातून त्यांनी सर्व उपस्थित महिलांना कालानुरूप मार्गदर्शन केले. तसेच ' वात्सल्य ' च्या वार्षिक मेळाव्यातील

सांस्कृतिक कार्यक्रमात PAP च्या विद्यार्थिनींनी उत्साही सहभाग घेतला.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना स्वावलंबनाची दिशा दाखविणारे हे प्रशिक्षण 'वात्सल्य' ने राजापूर , लातूर, दापोली , जव्हार येथे सुरु केले आहे. राजापूर येथे ५१ विद्यार्थिनी, लातूर येथे ३३ विद्यार्थिनी, दापोली येथे २० विद्यार्थिनी आणि जव्हार येथे ३० विद्यार्थिनी प्रशिक्षण घेत आहेत. तसेच ४० मुलींनी सानपाडा येथे प्रशिक्षण घेतले.

रुग्णसहाय्यक अभ्यासक्रमाला इंडिया डेव्हलपमेंट रिलीफ फंड (आयडीआरएफ) यांच्याकडून आर्थिक मदत केली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकतील तसेच खेडोपाड्यातील होतकरू मुलींना या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे रोजगाराच्या संधि उपलब्ध झाल्या आहेत.

## संगणक प्रशिक्षण केंद्रे

कांजूरमार्ग आणि सानपाडा येथे संगणक प्रशिक्षण केंद्रे वात्सल्य गेली १० वर्ष चालवित आहे. जवळील विभागातील गरजवंत आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी या संधीचा लाभ घेत आहेत. दरवर्षी दोन्ही सेंटर मधून जवळजवळ ७०० ते ८०० विद्यर्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण देण्यात येते. याच धर्तीवर कुर्ला येथे कौशल्य विकास केंद्र 'उडान 'ची स्थापना झाली. कुर्ला प्रकल्पाअंतर्गत दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच अलिबाग येथे कौशल्य विकास अंतर्गत संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले.

कोरोना महामारीच्या कालखंडात आपण सर्वांनीच अनुभवले आभासी शिक्षण किती महत्वाचे झाले. प्रत्यक्ष वर्गात बसून शिकता येत नसले तरी विद्यार्थी घरी राहून आपले शिक्षण पूर्ण करतो, हे शक्य झाले केवळ आणि केवळ आधुनिक युगातील तंत्रज्ञानाने. हाच विषय मनात ठेवून कांजूरमार्ग येथे दोन आभासी प्रशिक्षण केंद्राची उभारणी संस्थेतर्फे करण्यात आली. इतर सामाजिक संस्थांच्या सहभागातून गरजू मुलांना वरील व्यवसाय प्रशिक्षण दिले जाऊ शकते या विचारातून इ-विद्या संकल्पना उदयास आली. वात्सल्य ट्रस्टने इ-विद्या प्रकल्पाच्या अंतर्गत महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी २१ प्रशिक्षण केंद्र ह्या वर्षी उभारली. दि. ७ ऑक्टोबर २०२१ रोजी पहिले इ-विद्याचे केंद्र जनकल्याण निवासी विद्यालय लातूर आणि केशव सृष्टी कृषी तंत्र विद्यालय, भाईंदर येथे सुरु करण्यात आले.

१ जानेवारी २०२२ रोजी वात्सल्यने रत्नागिरी येथील मा. मुख्य न्यायाधीश श्री. सामंत सर यांच्या सहभागातून बालसुधार गृहातील मुलांना मोफत संगणकीय प्रशिक्षण सुरु केले. (१) 'एन.पी.अभ्यंकर यांचे रत्नागिरीचे निरीक्षण आणि डॉ.एन.डी. पानवलकर बालगृह', रत्नागिरी, (२) मातृमंदिर संचलित गोकुळ ऑर्फनेज, कनिष्ठ व वरिष्ठ मुलींचे बालगृह, देवरुख, (३) माहेर मुलींचे बालगृह, हातखंबा, (४) वात्सल्य मंदिर बालगृह, ओणी, (५) श्रीमती जानकीबाई(आक्का) तेंडुलकर महिलाश्रम लांजे संचलित निरीक्षण गृह बालगृह, लांजे, (६) सांदिपणी, कुडवली अश्या सहा बालगृहातील एकूण ५१ विद्यार्थ्यांना प्रशिक्षित देत आहोत .

प्रत्येक मानव जातीला सामान दर्जा मिळावा जसे पुरुषांसोबत आज स्त्रियाही सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्याचप्रमाणे वंचित राहिलेले तृतीयपंथी, एड्सग्रस्त, वेश्याव्यवसाय करणाऱ्या च्या मुला मुलींसाठी वात्सल्यने उल्हासनगर येथे 'आत्म-सन्मान' हे प्रशिक्षण केंद्र सुरु करून, वात्सल्य त्यांना स्वाभिमानाने जगण्यास प्रेरणा देत आहे.

लातूर येथे एच आय व्ही बाधित लोकांसाठी 'आम्ही सेवक' संस्था असून तिथल्या मुलांसाठी तसेच बालगृहा मधून

बाहेर पडणाऱ्या १८ वर्षावरील मुला-मुलींना कौशल्य विकास अंतर्गत मोफत संगणक प्रशिक्षण सुरु करण्यात आले. पंढरपूर मधील कवठाळी या गावामध्ये वीट भट्टी कामगारांची मुले शिकत असलेल्या 'राजनंदिनी हायस्कूल' मध्ये संगणक प्रशिक्षण चालू करण्यात आले आहे. तेथील ७० विद्यार्थी संगणक प्रशिक्षण घेत आहेत. एकूण २०२१-२०२२ मध्ये वात्सल्यच्या २१ केंद्रातून आतापर्यंत ७४९ विद्यार्थ्यांनी संगणकीय प्रशिक्षण यशस्वी रित्या पूर्ण केले आहे .

संगणकीय प्रशिक्षणाबरोबर व्यावसायिक प्रशिक्षणाचा लाभ मुलांना मिळावा या उद्देशाने २ नोव्हेंबर २०२१ रोजी कांजूर येथे डिजिटल सेन्टरचे उदघाटन करण्यात आले.

एन आय आय टी संस्थे मार्फत सानपाडा येथे १०० विद्यार्थ्यांना आणि कांजूरमार्ग येथे ३०० विद्यार्थ्यांना केवळ ३ महिन्याच्या कालावधीत मोफत प्रशिक्षण दिले आहे. एन आय आय टी संस्था विद्यार्थ्याना केवळ प्रशिक्षित करत नाही तर त्यानां त्या त्या क्षेत्रात नोकरीची हमीहि देते. 'आत्मविश्वासाने नोकरीसाठी मुलाखती कशा द्याव्यात आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शनपर शिबीर वात्सल्य ट्रस्ट मार्फत आयोजित करण्यात आले. जवळ जवळ १५० विद्यार्थ्याना नोकरीत रजु करण्यात आले आहे. येतील वर्षभरात ई-विद्या अंतर्गत जवळ जवळ ५० संस्थांच्या सहभागातून गरजू मुलांना व्यवसायिक प्रशिक्षण देण्याचा मानस आहे.





**संगणक प्रशिक्षण केंद्र**

## ड्राइव विथ प्राइड

ह्या वर्षभरात मुंबईत तसेच महाराष्ट्रातील विविध भागात 'वाहन चालकाचे' प्रशिक्षण १२५ प्रशिक्षणार्थिना देण्यात आले. ग्रामीण भागात काम करणाऱ्या विविध संस्थांच्या सहकार्याने वात्सल्य ने हे लोकोपयोगी काम हाती घेतले आहे. (१) श्रमिक मंच ग्रामीण विकास केंद्र, बीड - ३५, (२) सारथी यूथ फाऊनडेशन, सोलापूर - ३५, अन्नपूर्णा सेवाभावी संस्था, कराड – १५, प्रेरणा रूरल डेवलपमेंट फाऊनडेशन- १५ अशा १०० प्रशिक्षणार्थिना रोजगाराचे मार्ग उपलब्ध करून देण्यात आले. बांधकाम क्षेत्रातील ग्रामीण भागातील अवजड वाहन चालकांची गरज पाहता सेवालय, लातूर यांच्या सहकार्याने JCB चालविण्याचे प्रशिक्षण ५ प्रशिक्षणार्थिना देण्यात आले.

गणतव्या, पुणे यांच्या सहकार्याने गरजू स्त्रियांना प्रशिक्षण देवून अमेझोन, फ्लिपकार्ट सारख्या ई- कॉमर्स क्षेत्रा बरोबर जोडून देवून रोजगाराच्या संधि उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. त्याच प्रमाणे लातूर येथील जनाधार संस्थेच्या सहकार्याने तीनचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षणही महिलांना देण्यात येणार आहे.





ड्राइव विथ प्राइड

## निधी संकलन.

संस्थेची अहवालसालातील आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे. प्रत्येक देणगीदार हा संस्थेसाठी महत्वाचा आहे.

कागद व छपाईचे वाढलेले दर लक्षात घेता अहवालसालात रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त निधी दिलेल्या देणगीदारांची नावेच छापत आहोत याची कृपया नोंद घ्यावी.

### अहवालसालातील काही प्रमुख देणग्या

| | |
|---|---|
| श्री. छंगरानी चंदूर, माहीम | - रु. ३,५२,३४८/- |
| डॉ. कोवतल प्रज्ञा, खारघर | - रु. ३,००,०००/- |
| श्री. अनगळ रामचंद्र, पुणे | - रु. २,००,०००/- |
| सेव्ह दि चिल्ड्रन इंडिया | - रु. १,१६,३२२/- |
| श्रीमती नाटेकर भारती, मुलुंड | - रु. १,०२,०००/- |
| श्री. पिळगांवकर सुधीर व प्रतिभा, मुलुंड | - रु. १,००,००९.४४ |

### रु. १,००,०००/- प्रत्येकी

श्री. आंबेकर जयंत – ठाणे, डॉ. दवे सुशीलकुमार के. – कांदिवली, श्रीमती जोशी मंदा – अलिबाग, श्री. मंजिर भौमिक – कोलकत्ता, श्रीमती जुन्नरकर मोहिता – ठाणे

### रु. ८०,०००/- प्रत्येकी

रोटरी क्लब ऑफ अहमदाबाद, सुप्रीम चॅरिटेबल ट्रस्ट, दि. असोसिएटेड ऑटोपार्टस् प्रा. लि. – लॅमिन्टन रोड

### रु. ७५,०००/- प्रत्येकी

श्री. घुर्ये अनंत – ठाणे, इनर व्हिल क्लब ऑफ मुलुंड – मुलुंड, श्रीमती जोशी सुजाता – विलेपार्ले

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे **परिशिष्ट 'अ'** मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

## कायम ठेव योजना

देणगीदारांमध्ये ही योजना जास्त लोकप्रिय आहे. कायम ठेव योजनेअंतर्गत मिळालेल्या देणग्यांची रक्कम सरकारी रोखे किंवा राष्ट्रीयकृत बँका यांत गुंतवली जाते. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजाचा विनियोग देणगीदाराच्या सूचनेनुसार त्याच्या कुटुंबातील आप्तांच्या स्मरणार्थ / जन्मदिवसाप्रीत्यर्थ अथवा वाढदिवसाप्रीत्यर्थ एखाद्या विशिष्ट दिवशी संस्थेतील निवासी मुलांना दुध / खाऊ इ. देण्यासाठी केला जातो. त्यासंबंधी देणगीदाराला संस्थेकडून पत्राद्वारे कळवले जाते. जेणेकरून देणगीदारांशी संस्थेचा ऋणानुबंध कायम राहतो. या योजनेअंतर्गत एकच देणगीदार निरनिराळ्या कारणासाठी व निरनिराळ्या दिवसासाठीही देणगी देऊ शकतो.

अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| श्री. असईकर उमेश, विलेपार्ले | - रु. ३,००,०००/- |
| श्री. वनमाळी काशिनाथ, वसई रोड | - रु. २,५०,०००/- |
| श्री. चावला हरीश, विलेपार्ले | - रु. १,२५,०००/- |
| श्रीमती. पाठारे चित्रा, दहिसर | - रु. १,१२,०००/- |

### रु. १,००,०००/- प्रत्येकी

श्री. चंदावरकर देवेंद्र – भांडूप, श्रीमती दामले शिल्पा – ठाणे, श्रीमती जोशी माधुरी – पवई, श्री. जोशी वासुदेव – पुणे, श्री. कुलकर्णी दिलीप – ठाणे, एम.व्ही. सामंत चॅरिटेबल ट्रस्ट – बांद्रा, श्री. महाजन सुबोध – ठाणे, श्री. मराठे अशोक – घाटकोपर, श्री. फाटक श्रीकांत – बोरीवली, श्रीमती पुनाळेकर सुधा – बोरीवली, श्री. शेणॉय नित्यानंद – ठाणे, श्रीमती शिंदगी मंगल – कांदिवली

### रु. ९६,९९८/-

श्री. नागवानी आनंद – ऐरोली

### रु. ८०,०००/-

श्रीमती मनोहर विद्या अशोक – बदलापूर

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे परिशिष्ट 'ब' मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

## आर्थिक दत्तक योजना

या योजनेअंतर्गत काही देणगीदार आपल्या मासिक वेतनातून एखादी ठराविक रक्कम 'वात्सल्य' मधील बालकांच्या संगोपन व शिक्षणासाठी देणगीस्वरुपात देतात. ही रक्कम देणगीदार आपल्या सोयीनुसार एकरकमी किंवा हप्त्यानेही देऊ शकतात. नोकरदार देणगीदारांमध्ये हि योजना अत्यंत लोकप्रिय आहे.

दुसरा पर्याय म्हणजे काही देणगीदार एखाद्या अर्भकाच्या दुधाचा / जेवणाचा अथवा शाळेत जाणा-या एखाद्या मुला / मुलीच्या शिक्षणाचा वार्षिक खर्च देतात.

